फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)

## नियामक मंडळाची ७० वी बैठक

दिनांक : ०६/०६/२०१८

## -कार्यवृत्त व मंजुर ठराव-

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

## नियामक मंडळाच्या ७० व्या बैठकीचे कार्यवृत

दिनांक ०६/०६/२०१८ रोजी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ७० वी बैठक मा.मंत्री, जलसंपदा व पदसिध्द अध्यक्ष, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली, समिती सभागृह क्र.२, ७ वा माळा, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील प्रमाणे मा. मंत्री, मा. राज्यमंत्री व सन्माननीय सदस्य तसेच शासनाचे संबंधित निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

### (अ) नियामक मंडळाची उपस्थिती:-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा. ना. श्री. गिरीष महाजन | : | मा. मंत्री, जलसंपदा व पदसिध्द अध्यक्ष, विपाविम |
| २ | मा. ना. श्री. विजय शिवतारे | : | मा.राज्यमंत्री, जलसंपदा तथा उपाध्यक्ष, विपाविम |
| ३ | मा. श्री. देवाशिष चक्रवती | : | अप्पर मुख्य सचिव (नियोजन) व सदस्य |
| ३ | मा. श्री.यु.पी.एस.मदान | : | अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य |
| ४ | मा. श्री. रा.वा.पानसे | : | प्रधान सचिव (ज.सं.प्र.व वि.) व व्यवस्थापकीय संचालक (अतिरिक्त कार्यभार) |
| ५ | मा. श्री. अ.वा.सुर्वे | : | सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि) व सदस्य (अतिरिक्त कार्यभार) |
| ६ | मा. श्री. अ. वा. सुर्वे | : | सचिव व कार्यकारी संचालक |
| | **मा.सचिवांचे प्रतिनिधी** | | |
| १ | श्री.वि.र.दहिफळे | : | सहसचिव (वित्त) |
| २ | श्री.सु .कि.गारठे | : | सहसचिव (वने) |
| | **निमंत्रित अधिकारी** | | |
| ७. | श्री. सं. कृ. घाणेकर | : | मु.अ., विशेष प्रकल्प, जसंवि, अमरावती |
| ८ | श्री. र. प्र. लांडेकर | : | मु.अ., जलसंपदा विभाग, अमरावती |
| ९ | श्री. अ.रा. कांबळे | : | मु.अ., गो.प्र., जलसंपदा विभाग, नागपूर |
| १० | श्री. ब. शं. स्वामी | : | मु.अ., जलसंपदा विभाग, नागपूर |
| ११ | श्री. शं. रा.बळी | : | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (अतिरिक्त कार्यभार) |

मान्य

(इं. अ. वा. सुर्वे )
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

(गिरीष महाजन)
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

सर्वप्रथम विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या ७० व्या बैठकीस उपस्थित मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सन्माननीय सदस्यांचे कार्यकारी संचालक यांनी स्वागत केले. त्यानंतर मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यकारी संचालक यांनी विषयसूचीचे वाचन केले.

**विषय क्रमांक १ :-**

**दिनांक ३१/०१/२०१८ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ६८ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळास सादर करणेबाबत.**

नियामक मंडळाच्या दिनांक ३१/०१/२०१८ रोजी संपन्न झालेल्या ६८ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आला.

**विषय क्रमांक २:-**

**नियामक मंडळाच्या ६९व्या बैठकीतील ठराव वाचून कायम करणे.**

सदर विषय कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळासमोर खालील प्रमाणे विषद केला.

नियामक मंडळाची ६९ वी बैठक दिनांक ०८/०३/२०१८ रोजी मा. मंत्री, जलसंपदा तथा पदसिध्द अध्यक्ष, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. ६९ व्या बैठकीचे कार्यवृत महामंडळाचे पत्र क्र. ४२६८ दि. २६/०४/२०१८ नुसार मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आले.६९ व्या बैठकीतील खालीलप्रमाणे मंजुर ठराव कायम करण्यासाठी नियामक मंडळासमोर सादर करण्यात येत असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले.

मा.उपाध्यक्ष तथा राज्यमंत्री (जलसंपदा) यांनी , ठराव क्रमांक ६९/२ मध्ये मान्य केलेले ०९ प्रकल्पांचे एकुण रु.६८.११८ कोटीचे निविदा दायित्वास व घोडाझरी शाखा कालव्याचे निविदेचे दायित्वाची रक्कम रु. १८.३७ कोटी चे दायित्वाबाबत विचारणा केली असता, शासन निर्णय दि.२२/१२/२०१७ मधील परिच्छेद ३.६.२ नुसार समितीने शिफारस केलेले / स्विकारार्ह असलेले प्रस्ताव महामंडळाने त्यांच्या धारिकेतुन नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार मा.व्यवस्थापकीय संचालक व मा. अध्यक्ष यांच्या मंजुरीसह नियामक मंडळासमोर पुढील मान्यतेस्तव सादर करावेत असे नमुद आहे. वेळेअभावी ही प्रक्रिया होऊ शकली नाही. तथापी, या १० प्रकल्पांचे दायित्व प्रस्ताव धारिका मा.व्यवस्थापकीय

मान्य

(इं. अ. वा. सुर्वे)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

(गिरीष महाजन)
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

संचालक व मा. अध्यक्ष यांच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आले असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले.

**यावर चर्चा होउन,** नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले खालील ठराव कायम करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात आला. **परिशिष्ट -१**

**ठराव क्रमांक ७०/ १ :-**

**ठराव करण्यात येतो की, "नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले खालील ठराव कायम करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्रमांक ६९/ १ :-**

ठराव करण्यात येतो की, "नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले खालील ठराव, ठराव क्रमांक ६८/२५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करुन कायम करण्यात येत आहे."

**सुधारित ठराव क्रमांक ६८/२५ :-**

ठराव करण्यात येतो की, "निम्न पेढी प्रकल्प ता. भातकुली जि. अमरावती, योजनेच्या लाभक्षेत्रांतर्गत सिंचनाकरीता परंपरागत कालवा व वितरण प्रणाली ऐवजी शीर्ष विमोचकानजीक पंपगृहे उभारुन सिंचनासाठी स्वयंचलीत दाबयुक्त नलिका वितरण प्रणालीचा पर्याय स्विकारण्याच्या प्रस्तावास व हे काम EPC (Engineering, Procurement & construction) निविदा प्रणालीव्दारेचा प्रस्ताव तसेच प्रकल्पावर झालेला खर्च रु.१११.८९ कोटी क्षमापित करण्यास तसेच बांधकामाकरिता संपादित केलेली जमीन प्रकल्पाच्या इतर कामांसाठी (उदा. पाईपलाईन टाकणे, प्रशिक्षण केंद्र, सौर उर्जा प्रकल्प इ. उपक्रमांसाठी) उपयोगात आणण्याचे अटीचे अधीन नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ६९/२ :-**

ठराव करण्यात येतो की, "महामंडळाकडील प्रकल्पांच्या निविदांतर्गत निर्माण होणाऱ्या एकूण १६ प्रकल्पांचे रु. ११९.९३ कोटी किंमतीच्या निविदा दायित्वांचे प्रस्तावांपैकी महामंडळ स्तरावरुन शिफारस केलेले व शासन स्तरावरील समितीव्दारे पत्र क्र. संकिर्ण २०१८/(९४/२०१८)/लपा, दि. ०७/०३/२०१८ शिफारस केल्यानुसार सादर यादीतील ०९ प्रकल्पांचे एकुण रु.६८.११८ कोटीचे निविदा दायित्वास व वर नमुद केलेप्रमाणे घोडाझरी शाखा कालव्याचे निविदेचे (करारनामा क्र. ब-१/३१/वि.स्त./२००६-०७) दायित्वाची रक्कम रु. १८.३७ कोटी चे दायित्वास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे." तसेच सदर ठराव कायम होण्याची प्रतिक्षा न करता नियामक मंडळाचे ६६ व्या बैठकीतील मंजुर ठराव क्र.६६/२२ नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मान्य

**(इं. अ. वा. सुर्वे )**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

**(गिरीष महाजन)**
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

**ठराव क्रमांक ६९/३ :-**

ठराव करण्यात येतो की, "कुंभारकिन्ही लघु प्रकल्पाच्या मौजा कुंभारकिन्ही/मांगकिन्ही ता.दारव्हा जि.यवतमाळ येथील संपादीत जमिनीच्या प्रकरणात मा. दिवाणी न्यायालयाचे निर्णयावर ज्या प्रकरणांवर विधी व न्याय विभागाने नो अपिल "To acquiesce" सल्ला दिलेला आहे. त्या प्रकरणांतील अभिप्रायानुसार कार्यवाही करून शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देणेस हरकत नाही. उर्वरित प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ला घेणेचे अटीचे अधीन राहून शेतकऱ्यांना वाढीव मोबदला अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ६९/४ :-**

ठराव करण्यात येतो की, निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्राचे सर्वेक्षण व संकल्पन कामासंबंधी मे.यश इंजिनिअर्स औरंगाबाद यांचा करारनामा क्र. ब-१/२१/निपैप्र /२००६-०७ मधील दाव्यासंबंधी मा.न्यायमुर्ती श्री. डी.एस. झोटींग, (निवृत्त) लवादकासमोर महामंडळाची बाजु मांडण्यास्तव ॲड. डॉ. श्री. मिलींद वानखेडे, तांत्रीक सल्लागार यांची नेमणुक करुन यांना विधी शुल्क म्हणुन एकमुस्त रक्कम रु. २,८०,०००/- अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ६९/५ :-**

ठराव करण्यात येतो की, "प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बेघरांसाठी घरकुले बांधकामाकरीता पाटबंधारे विभाग, नागपूर यांचे मालकीचे मौजा पाटणसांवगी / कोराडी / घोरपड / गुमथळा / वडोदा येथील ७.४९ हे. क्षेत्र नागपूर मेट्रो रिजन विकास प्राधिकारण / नागपूर सुधार प्रन्यास / म्हाडाला हस्तांतरीत करण्याकरिता अस्तीत्वातील निवासी / अनिवासी इमारतीच्या बांधकामाखालील ११५७५.५६० चौ.मी. चटईक्षेत्राचे विनामुल्य बांधकाम करुन देण्याच्या अटीवर महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१६ / प्र.क्र.२१३/ज-१, दिनांक १९ सप्टेंबर २०१६ नुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ६९/६:-**

ठराव करण्यात येतो की, "दि.२४.१२.२०१७ रोजी झालेल्या बळीराजा जलसंजीवनी योजना कार्यान्वितीकरण समारंभा करीता खर्च झालेला रु.१५.०० लक्ष (अक्षरी रु.पंधरा लक्ष फक्त) चा खर्च कोची अंबेझरी ल.पा.योजनेच्या किरकोळ खर्चामधुन अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

मान्य

**(इं. अ. वा. सुर्वे )**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

**(गिरीष महाजन)**
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

**ठराव क्रमांक ६९/७ :-**

ठराव करण्यात येतो की, "तुमसर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीने विनामुल्य देवू केलेल्या जागेवर शेतकरी प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे बांधकामाकरिता रु.४.३३ कोटी भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द, बावनथडी, करजखेडा, सुरेवाडा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रानुसार त्या त्या प्रकल्पाच्या उपलब्ध 'के' इमारत या शिर्षामधुन इमारत बांधण्याचे प्रस्तावास तसेच इमारतीचे व्यवस्थापन व पुढील कार्यवाही मालकी हक्काबाबत सुस्पष्ट करार करुनच कार्यवाही करण्याचे अधीन नियामक मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ६९/८:-**

ठराव करण्यात येतो की, "बेंडारा मध्यम प्रकल्पाच्या सांडव्यामुळे बाधीत होणाऱ्या मौजा बेरडी (नविन) गावठाणातील अतिक्रमीत सरकारी व खाजगी मालकीच्या जागेवर बांधलेल्या इमारतींकरिता विभागीय आयुक्त, नागपूर तसेच जिल्हाधीकारी, चंद्रपूर यांनी शिफारस केले नुसार सानुग्रह अनुदान रु.२४३.२६ लक्ष एकमुस्त देण्यास नियामक मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे."

मान्य

**(इं. अ. वा. सुर्वे)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

**(गिरीष महाजन)**
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

**विषय क्रमांक ३ :-**

**महामंडळातील प्रकल्पांच्या निविदांतर्गत निम्न वर्धा व चंद्रभागा प्रकल्पांवर निर्माण होणाऱ्या अतिरिक्त दायित्वास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषय कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळासमोर खालील प्रमाणे विषद केला.

शासनाचे दि. २२/१२/२०१७ चे निर्णयानुसार सिंचन प्रकल्पावरील आर्थिक दायित्वावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने अतिरिक्त दायित्व मंजुरीबाबत मार्गदर्शक सुचनेप्रमाणे महामंडळांतर्गत विविध प्रकल्पांचे संबंधित निविदा दायित्वाचे प्रस्ताव व नव्याने उद्भवलेले दायित्व प्रस्ताव, अशा सर्व प्रस्तावांचे मान्यतेबाबत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळस्तरावर गठीत समितीची दि.२४/०१/२०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत महामंडळातंर्गत एकूण १६ प्रकल्पांचे रु. ११९.९३ कोटी किंमतीच्या निविदा दायित्वांचे प्रस्तावांवर चर्चा होऊन प्रस्ताव शिफारसीसह शासन स्तरावरील समितीकडे सादर करण्याची सहमती देण्यात आली.

शासन निर्णय दि.२२/१२/२०१७ मधील परिच्छेद ३.६.२ नुसार समितीने शिफारस केलेले / स्विकारार्ह असलेले प्रस्ताव महामंडळाने त्यांच्या धारिकेतुन नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार व्यवस्थापकीय संचालक व मा. अध्यक्ष यांच्या मंजुरीसह नियामक मंडळासमोर पुढील मान्यतेस्तव सादर करावेत असे नमुद आहे.

महामंडळ स्तरावरून शिफारस केलेले व शासन स्तरावरील समितीव्दारे शिफारस असलेले प्रस्ताव शासन निर्णय दि. २२/१२/२०१७ नुसार नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

सदर दायित्व मंजुरीचे पद्धतीनुसार शासन स्तरावरील समितीची बैठक दि. ०६/०३/२०१८ व दि.०७/०३/२०१८ रोजी संपन्न झाली. त्याचे इतिवृत्त पत्र क्र.संकिर्ण २०१८/(९४/२०१८)/लपा. दि.०७/०३/२०१८ नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकी दरम्यान दि. ०८/०३/२०१८ रोजी प्राप्त झाले.

शासन स्तरावरील समितीच्या इतीवृत्तामध्ये निम्न वर्धा, चंद्रभागा मध्यम प्रकल्प व गोसीखुर्द प्रकल्पाच्या घोडाझरी शाखा कालव्यावरील निविदा प्रकरणी या प्रकल्पांबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी चालु असल्याने, या प्रकल्पावरील निविदामधील दायित्वांबाबत नियामक मंडळात निर्णय घेणे योग्य होईल असे इतिवृत्तात नमुद आहे.

इतिवृत्तामध्ये नमुद ९ निविदा दायित्वास समितीने शिफारस केल्यानुसार रु. ६६.११८ कोटी दायित्वास तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु असलेल्या घोडाझरी शाखा कालव्याचे निविदेच्या रु.१८.३७ कोटीचे दायित्वास दि. ०८/०३/२०१८ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत मंजुर ठराव क्र. ६९/२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

वर्ष २००६ ते २०१० या कालावधीत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना एकूण ३८ पाटबंधारे प्रकल्पांना दिलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या यादीमध्ये निम्न वर्धा (मोठा प्रकल्प )

मान्य

| | |
|---|---|
| **(इं. अ. वा. सुर्वे )** | **(गिरीष महाजन)** |
| **कार्यकारी संचालक व सदस्य सचिव** | **मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष** |

व चंद्रभागा मध्य प्रकल्पाचा समावेश आहे. तसेच या ३८ प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात येत असलेल्या चौकशीमध्ये या दोन प्रकल्पांचा अंतर्भाव आहे.

**निम्न वर्धा प्रकल्प :-**

मुख्य कालवा कि.मी. १ ते ४५ मधील अस्तरिकरणाचे काम मे. श्रीनिवासा कन्सट्रक्शन, नागपूर यांना ८.१०% अधिक दराने देण्यात आले या कामाचा करारनामा क्र. ब-१/३९/डीएल/२००८-०९ अन्वये सदर अस्तरीकरणाचे कामास माहे फेब्रुवारी २००९ मध्ये सुरुवात झाली. सदरचे काम पुर्ण झाले असुन अंतिम देयक अदा करावयाचे आहे. प्रत्यक्ष बांधकाम करतांना मऊ स्तरातील खोदकाम, चिप मेसनरी १:८, १२ मी.मी. जाडीचा प्रसरण जोड (Bituminous Pad) इत्यादी बाबींच्या परिमाणात १२५% पेक्षा जास्त वाढ झाली असल्याने कलम ३८ अंतर्गत रु. ३.१७ कोटी दायित्व येत आहे.

**वाढीची कारणे :-**

सदर काम वर्ष २००५-०६ मध्ये पुर्ण झाले तेव्हापासून कालव्यात पावसाच्या पाण्यामुळे सतत माति खचत राहिल्याने व माती उपसण्यासाठी मंजुर अंदाजपत्रकात तरतुद केली नसल्याने मऊस्तरातील खोदकामाच्या परिमाणात वाढ झाली त्यामुळे रु. ०.४७ कोटी वाढ होते.

- चिप मेसनरी १:८ मुख्य कालव्याच्या कि.मी. ११ ते १८ मध्ये अंदाजपत्रकात ही बाब अंतर्भुत नसल्याने तसेच वाढीव कालव्याच्या लांबित प्रत्यक्ष झालेल्या कामानुसार या बाबींच्या परिमाणात वाढ झाली आहे त्याची किंमत रु. २.५३ कोटी आहे.
- १२ मी.मी. जाडीचा प्रसरण जोड (Asphalt Joint) संधानक अस्तरिकरणात PVC Strip Joint ऐवजी Asphalt joint दिल्याने परिमाणात वाढ झाली आहे. यामुळे रु. ०.१७ कोटी दायित्व निर्माण होत आहे.
- एकूण निविदा कलम – ३८ अंतर्गत किंमत रु. ३.१७ कोटी (०.४७ + २.५३ + ०.१७)
- अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर यांनी दिनांक ०९/०२/२०१६ रोजी अस्तरीकरणाच्या Groove Filling (Construction joint) भरण्याच्या रु. ०.८४ कोटी अतिरिक्त बाबीस मान्यता दिली आहे.
- याच अनुषंगाने शासन पत्र दि. ०३/०९/२०१३ अन्वये मुख्य कालवा किमी १ ते ४५ या लांबितील अस्तरीकरणाचे संधानकात Fabrillated Polypropylene Fibre चा वापर
- 

मान्य

(इं. अ. वा. सुर्वे)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

(गिरीष महाजन)
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

करण्याची अतिरिक्त बाब रु. ३.८२ कोटीस मान्यता दिली आहे. या अंतर्गत प्रत्यक्ष झालेल्या कामाची किंमत रु. २.७६ कोटी अशी येते.

- एकुण अतिरिक्त बाब दरसुची किंमत (०.८४ + २.७६ ) रु. ३.६० अशी येते.

आर्थिक दायित्वाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(रु. कोटी)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा किंमत (८.१०% अधिक दरासह) | ११८.१६ |
| २ | १००% परिमाणा पर्यंत किंमत | ११४.७८ |
| ३ | १०० ते १२५ % मधील परिमाणाची किंमत | १२.४६ |
| ४ | १२५% चे वरिल कलम – ३८ ची किंमत | ३.१७ |
| ५ | अतिरिक्त बाब दरसुची मुळ किंमत (EIRL) | ३.६० |
| ६ | एकुण सुधारित अद्यावत किंमत ( २ +३ + ४ +५) | १३४.०१ |
| ७ | निविदेवरील अतिरिक्त निव्वळ दायीत्व व त्याची टक्केवारी | १५.८५ (१३.४१%) |

उपरोक्त तक्त्यानुसार अतिरिक्त निव्वळ दायित्व रु. १५.८५ कोटी असून यापैकी निविदेनुसार १०० ते १२५ मधील परिमाणाची निविदा शर्तीनुसार देय दायित्व रु. १२.४६ वगळुन कलम ३८ व अतिरिक्त बाब दरसुचीमुळे निर्माण होणारे **रु. ३.३९ कोटीच्या दायित्वास** मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले.

**चंद्रभागा मध्यम प्रकल्प :-**

चंद्रभागा मध्यम प्रकल्पाचे करारनामा क्र. ब-१/४२/वि.स्त./२००८-०९ अंतर्गत लाभक्षेत्रातील पी. व्ही. सी. पाईपलाईनव्दारे पाटचाऱ्यांची कामात संकल्पनातील बदलामुळे परिशिष्ट 'ब' मध्ये समाविष्ट बाबींपैकी काही बाबींमध्ये अतिरिक्त बाब निर्माण होत असल्यामुळे निविदेवर वाढीव दायित्व (मुल्यवृद्धी वगळून) रु. २९२.४२ लक्ष दायित्व निर्माण होत आहे.

निविदेंतर्गतच्या लाभक्षेत्राचे सर्वेक्षण करुन अधीक्षक अभियंता यांनी मंजुर केलेल्या संकल्पनानुसार (भाग १ ची कामे) १८० ते २८० मी.मी. कासाच्या परिंमाणात वाढ झालेली आहे. लाभक्षेत्र तुलनात्मक दृष्ट्या सपाटक्षेत्र असल्याने निविदेतील लहान व्यासांच्या पाईपमध्ये बचत होऊन, मोठ्या व्यासाचे पाईपमध्ये वाढ झालेली आहे. मोठ्या व्यासाचे पाईपची बाबत परिशिष्ट-ब मध्ये अंतर्भुत असल्याने, मोठ्या व्यासाचे परिमाणात वाढ होत असल्याने निविदा दराने भुगतान प्रस्तावित आहे.

मान्य

**(इं. अ. वा. सुर्वे )**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

**(गिरीष महाजन)**
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

तसेच रस्ते ओलांडणीसाठी R.C.C. पाईप टाकणेसाठी व इतर दोन बाबीसाठी अतिरिक्त बाब दरसुची प्रस्तावित आहे.

आर्थिक दायित्वाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा किंमत(४.९० टक्के अधिक दरासह) | १०३५३६०८६/- |
| २. | सुधारित अद्यावत किंमत (अतिरिक्त बाबीसह) | १४२१०६१५/- |
| ३. | १०० ते १२५ % मधील परिमाणाची किंमत | २५८०९६५७/- |
| ४. | १२५% चे वरिल किंमत | निरंक |
| ५. | अतिरिक्त बाब दरसुचीमुळे येणारी किंमत | **४६५६८८७/-** |
| ६. | इतर गोष्टीमुळे झालेली वाढ / बचत | (-) १२२४५०३/- |
| | **अ**) एकूण (३+४+५+६) | २९२४२०४१/- |
| | **ब**) मुल्य वृद्धीमुळे येणारी वाढ | ९३२८०२४/- |
| | निविदेवर येणारे दायित्व (अ+ब) | ३८५७००६५/- |
| | एकूण दायित्व (६ - ७) | २९२४२०४१/- |

चंद्रभागा मध्यम प्रकल्पाच्या रु.२२२.४८कोटी किंमतीच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीच्या दि.१३/१२/२०१७ चे बैठकीत निर्णय झालेला आहे. मा. सचिव उपसमितीचे इतिवृत्त दि.५/०५/२०१८ ला प्राप्त झालेअसून, सुधारित प्रशासकीय मान्यतेची पुढ़ील कार्यवाही करण्यात येत आहे.

चंद्रभागा मध्यम प्रकल्पाचे काम जवळपास पुर्ण झालेले असून फक्त भाग १ चे पाईपलाईनचे एकूण ५४४९ हे. क्षेत्रापैकी ४७०० हे. ची कामे पुर्ण झाली असून उर्वरित ७४९ हे. क्षेत्रावरील कामे प्रगतीपथावर आहेत.

निम्न वर्धा व चंद्रभागा या प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी चालु असल्याने या निविदांबाबत शासन स्तरावरील समितीच्या दि. ६ व ७ मार्च २०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तामधील निर्देशानुसार नियामक मंडळाच्या निर्णयार्थ ठेवण्यात येत असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले.

मान्य

**(इं. अ. वा. सुर्वे)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

**(गिरीष महाजन)**
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

**यावर चर्चा होउन,** निविदांतर्गत निर्माण होणाऱ्या निम्न वर्धा व चंद्रभागा प्रकल्पांचे कलम ३८ व अतिरिक्त बाब दरसुचीमुळे निर्माण होणाऱ्या अनुक्रमे रु.३.३९ कोटी व रु.०.४६ कोटी असे एकुण रु.३.८५ कोटी किंमतीच्या निविदा दायित्वास मा. व्यवस्थापकीय संचालक व मा. अध्यक्ष यांचे मंजूरीचे अधीन नियामक मंडळाची मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात आला. **परिशिष्ट -१**

**ठराव क्रमांक ७०/२ :-**

**ठराव करण्यात येतो की, "महामंडळाकडील प्रकल्पांच्या निविदांतर्गत निर्माण होणाऱ्या निम्न वर्धा व चंद्रभागा प्रकल्पांचे कलम ३८ व अतिरिक्त बाब दरसुचीमुळे निर्माण होणाऱ्या अनुक्रमे रु.३.३९ कोटी व रु.०.४६ कोटी असे एकुण रु.३.८५ कोटी किंमतीच्या निविदा दायित्वांचे प्रस्तावांना महामंडळ स्तरावरुन शिफारस केलेले व शासन स्तरावरील समितीने नियामक मंडळात निर्णय घेणेबाबत सुचविल्यानुसार उपरोक्त दोन निविदा कामांच्या एकुण रु.३.८५ कोटीचे निविदा दायित्वास मा. व्यवस्थापकीय संचालक व मा. अध्यक्ष यांचे मंजूरीचे अधीन नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

मान्य

(इं. अ. वा. सुर्वे)
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

(गिरीष महाजन)
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**